# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरूवार, दिनांक २ जुलै, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

**अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये —**

**(मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"**राज्यात मराठी भाषा संवर्धनासाठी राज्यस्तरीय संस्था उभारुन धोरण निश्चिती करण्याबाबत**" या विषयावरील श्री. सतेज उर्फ बंटी पाटील यांचा दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र. ३ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ४८१४ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक २ व ३]**

(२) **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील सेवेत कार्यरत शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले असणे, तथापि, सध्याच्या टीईटी परीक्षेचे स्वरूप शिक्षकांच्या प्रत्यक्ष अध्यापन कौशल्यांचे सर्वसमावेशक मूल्यांकन करण्यास अपुरे असल्याबाबत शिक्षक संघटना व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून सातत्याने आक्षेप नोंदविण्यात येत असणे, शिक्षकांच्या सेवाकालीन अनुभव, शैक्षणिक उपक्रमांमधील सहभाग, प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधनवृत्ती, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न यांचा शिक्षकांच्या पात्रता निर्धारणामध्ये विचार करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांसाठी दरवर्षी ५० तासांचे सातत्यपूर्ण व्यावसायिक प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आले असणे, या प्रशिक्षण प्रक्रियेला टीईटी मूल्यांकनाशी सुसंगत करून व्यावसायिक क्रेडिट-आधारित पात्रता प्रणाली विकसित करण्याची आवश्यकता असणे,

शिक्षक पात्रता परीक्षेच्या विद्यमान स्वरूपाचा पुनर्विचार करणे, राज्यस्तरीय कार्यगट स्थापन करणे तसेच सी-टीईटी परीक्षा मराठी भाषेत उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"ठाणे शहरातील वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण व वाहतूक कोंडीमुळे प्रस्तावित ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पाबाबत तज्ज्ञ, नागरिक आणि वाहतूक अभ्यासकांकडून विविध आक्षेप नोंदविण्यात आले असणे, सुमारे २९ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात बांधकाम होणार असल्यामुळे वाहतूक कोंडी, ध्वनी व वायू प्रदूषण तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असणे, याशिवाय शहरातील रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, बस सेवा तसेच बस स्थानक परिसरातील वाहतूक व्यवस्थापन आणि अंतर्गत संपर्क मार्गांचे बळकटीकरण केल्यास तुलनेने कमी खर्चात अधिक परिणामकारक उपाय उपलब्ध होऊ शकतील असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले असणे, त्यानुषंगाने शासनाने ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पाऐवजी शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी उपाययोजना राबविण्याबाबत करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ४ व ५]**

**(४) सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

" गडचिरोली हा राज्यातील अतिदुर्गम, आदिवासीबहुल, पेसा क्षेत्रात समाविष्ट व नक्षलग्रस्त जिल्हा असून भौगोलिकदृष्ट्या दुर्गम परिस्थितीमुळे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत उच्च शिक्षणाचा अपेक्षित विकास झालेला नसणे, गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बहुतांश महाविद्यालये विनाअनुदान तत्त्वावर कार्यरत असल्याने शिक्षणाचा दर्जा, पायाभूत सुविधा व गुणवत्तापूर्ण मनुष्यबळावर प्रतिकूल परिणाम होत असणे, गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अनुदान देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, गडचिरोली किंवा चंद्रपूर येथे स्वतंत्र सहसंचालक, उच्च शिक्षण

कार्यालय स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याशिवाय दिनांक १ जानेवारी, १९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीत सेवेत असलेल्या एम.फिल. अर्हताधारक प्राध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ मंजूर करण्याबाबत प्रकरणे प्रलंबित असणे, गोंडवाना विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील रिक्त पदे भरणे, विद्यापीठात स्वतंत्र HRDC स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

" राज्यातील सामान्य जनतेला दर्जेदार व मोफत आरोग्य सुविधा पुरविण्याच्या बाबतीत शासकीय यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरली असणे, शासकीय रुग्णालयांमध्ये अपुरा कर्मचारी वर्ग, औषधांचा तुटवडा आणि वेळेवर उपचार न मिळणे यामुळे राज्यातील सुमारे ८० टक्के रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचारांसाठी जावे लागत असणे, राज्यात विमा योजनांच्या प्रीमियमपोटी कोट्यवधी रकमेचा शासकीय निधी खर्च होत असणे, परंतु त्याचा लाभ केवळ ८.५ टक्के रुग्णांनाच मिळत असणे, हा प्रशासकीय निष्काळजीपणा आणि सार्वजनिक निधीचा अपव्यय असणे, शासकीय रुग्णालये सक्षम करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलून राज्यात 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ह्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने तसेच सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे मोठ्या प्रमाणावर खासगीकरण झाल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांची लूट करणाऱ्या रुग्णालयांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ६]**

(६) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"**राज्यातील शासकीय वैद्यकीय संस्थांमध्ये पोर्टेबल एम.आर.आय. प्रणालीची अंमलबजावणी करणेबाबत**" या विषयावरील श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७१५० ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक १ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ७ व ८]**

(७) **श्री.कृपाल तुमाने, डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे धोरण शासनाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये जाहीर केलेले असणे, ऊर्जा वापरावर होणाऱ्या खर्चात सदर योजनेमुळे दीर्घकालीन आर्थिक बचत होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलासा मिळणार असणे, तथापि सदर प्रकल्प राबविताना स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचा आर्थिक हिस्सा उभारावा लागून प्रकल्पांसाठी प्रारंभी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागणे, त्याकरिता राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नगरपरिषद/ नगरपंचायतींना शासनाकडून विशेष आर्थिक पॅकेज किंवा वाढीव अनुदान अथवा सौर ऊर्जा प्रकल्प राबविताना खाजगी भागीदारी मॉडेलचा अवलंब करण्याबाबतत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(८) **सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"गंगापूर - लातूर मार्गावरील शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करणे गरजेचे असून सदर मार्गावरुन दररोज शेकडो वाहनांची वाहतूक होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम त्वरीत पूर्ण करण्याची मागणी केलेली असणे, प्रशासनाने ठेकेदारास माहे मे, २०२६ पर्यंत सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले असून त्यानुषंगाने गंगापूर येथील शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) महसूल मंत्री** : "राज्यातील ठाणे पालघर व रायगड जिल्ह्यातील घर खरेदीदारांना विकासकाकडून नुकसान भरपाईपोटी येणारी रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याकडून हलगर्जीपणा होणे यासंबंधाबाबत" या विषयाबाबत ॲड.निरंजन डावखरे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ११० वरील चर्चेच्या वेळी दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**(३) वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखे व सन २०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) वने मंत्री** : **(क)** "महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल आणि लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ मधील अनुसुची मधील {२ साग (Teak)} वृक्ष वगळण्याबाबतची अधिसूचना क्र. टिआरएस-१०/२०२५/प्र.क्र.२४४/फ-६ दिनांक ०९-०६-२०२६ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा.**

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(१) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील कनिष्ठ लेखा परिक्षक/रोखपाल पदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना अनियमितता होणे.

(२) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

चिपळूण (जि. रत्नागिरी) विकासाला अडथळा ठरलेल्या पुररेषेचे तातडीने फेरसर्वेक्षण करण्याबाबत.

(३) **श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

मुंबई महानगरपालिकेंतर्गत खाजगी शाळांना आर टी ई सोबतच मुंबई मनपाची 'मुदत वाढ' मान्यता घेण्याचे बंधन दूर करणेबाबत.

(४) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर ग्रामविकास मंत्री निवेदन करतील :-**

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली पंचायत समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत.

(५) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत घरकुल मंजुरी व बिल वाटप प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला आर्थिक गैरव्यवहार.

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री सदाशिव खोत, सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री प्रविण दरेकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यंदाच्या खरीप हंगामात राज्यासमोर कमी पावसाचे संकट निर्माण होण्याची शक्यता असून जागतिक परिस्थितीमुळे रासायनिक खतांच्या उपलब्धतेवरही परिणाम होण्याची शक्यता असणे, मा.मुख्यमंत्र्यांनी खरीप हंगाम २०२६ च्या तयारीसंदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत पीक कर्ज वितरण, बियाणे व खत उपलब्धता, कृषी क्षेत्रातील डिजिटल उपक्रम तसेच इंधन पुरवठ्याबाबत

प्रशासनाला आवश्यक निर्देश दिलेले असणे, हवामान विभागाने अल-निनोच्या प्रभावामुळे राज्यात दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ८८ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला असून, पश्चिम विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये पर्जन्यमानातील तुटवडा अधिक गंभीर राहण्याची शक्यता असणे, संपूर्ण राज्यातील पेरण्या खोळंबल्या असून उशिरा पेरणी केल्यास रब्बी हंगामावर विपरीत परिणाम होऊन पिकांवर रोग-किडीचा प्रादुर्भाव दिसून उत्पादनात खर्च वाढणे, उत्पादन घटल्याने पावसाअभावी शेतकऱ्यांवर 'दुबार पेरणी'चे मोठे आर्थिक संकट येणे, यंदा विक्रेत्यांनी क्रेडिटवर माल न देता ॲडव्हान्स पैसे घेऊन माल खरेदी करणे, त्यामुळे विक्रेत्यांनी लाखो रुपये गुंतवून साठा करून ठेवणे, बाजारात खते आणि बियाण्यांना मागणी नसल्याने संपूर्ण भांडवल अडकून पडून किरकोळ विक्रेते आणि शेतकरी अडचणीत सापडणे, ग्रामीण भागात मशागतीच्या कामांसाठी पेट्रोल व डिझेल टंचाई जाणवत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, या पार्श्वभूमीवर शासनाने शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात पीक कर्ज उपलब्ध करून देणे, प्रमाणित बियाणे व खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे, इंधन साठेबाजी विरोधात कठोर कारवाई करणे, ग्रामीण भागातील विहिरी, बोअरवेल आणि पारंपरिक जलस्रोतांची पाणीपातळी कमालीची खालावली गेल्याने त्याचा थेट फटका पशुधनाला बसून हिरवा चारा शेतकऱ्यांना बाहेरून महागड्या दराने खरेदी करावा लागून आर्थिक भार सहन करावा लागणे, आगामी काळात दूध उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जाणे, 'अल निनो'च्या प्रभावामुळे राज्यात पुन्हा एकदा भीषण आर्थिक समस्यांच्या मालिकेत तसेच आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता असल्याने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर उपनगरातील वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने मुंबई वाहतुकीचा कणा असलेल्या लोकल ट्रेनच्या प्रवासावर प्रश्न चिन्ह निर्माण होणे, लोकल ट्रेनच्या प्रवासात हजारो नागरिकांचा अपघातात मृत्यू होणे, त्याच प्रमाणे प्रवासादरम्यान लोकल डब्यांमध्ये होणाऱ्या क्षुल्लक कारणांमुळे होणाऱ्या भांडणामुळे शिवीगाळ, मारामारी, खून यांसारख्या घटनांमध्ये वाढ होणे, दिनांक २३ जून, २०२६ रोजी अंधेरी ते बोरिवली दरम्यान धावत्या लोकलमधील फर्स्ट क्लास डब्यात मुसळधार पावसात डब्याचा दरवाजा बंद करण्यावरून झालेल्या किरकोळ वादातून २२ वर्षीय तरुणाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आल्याची गंभीर घटना घडणे, त्याचप्रमाणे मुंबई रेल्वे स्थानकांवर गर्दुले, दारुडे, भिकारी यांची दहशत असणे, सदर घटनेने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण होणे, नागरिकांचा रेल्वे प्रवास सुरक्षित व्हावा या हेतूने रेल्वे स्थानके व

लोकलच्या सगळ्या डब्यांमध्ये २४ तास गृह विभागाकडून सुरक्षा व्यवस्था वाढविण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील सारोळा येथील प्रादेशिक जलशुद्धीकरण केंद्राच्या पाणी साठवण टाकीत दिनांक ३१ मे, २०२६ रोजी मृत बैल आढळल्याची घटना घडलेली असणे, बोदवड व मुक्ताईनगर तालुक्यातील ५१ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या या महत्त्वाच्या जलशुद्धीकरण केंद्रात मृत बैल पडून असणे, संबंधित कर्मचाऱ्यांनी कोणतीही पाहणी न करता लाखो नागरिकांना सतत पाच दिवस दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा सुरू ठेवलेला असणे, या गंभीर निष्काळजीपणामुळे हजारो नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असणे आणि स्थानिक प्रशासनाच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र असंतोष व्यक्त करून रास्ता रोकोचा प्रयत्न केलेला असणे, घटनास्थळी पाहणी केल्यानंतर जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या या कृत्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होऊन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी झालेली असणे, जलशुद्धीकरण केंद्राच्या कामकाजात झालेली ही हेळसांड अत्यंत गंभीर असणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर तात्काळ निलंबनाची कठोर कारवाई करणे, पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित व तांत्रिक तपासणी अनिवार्य करणे, तसेच भविष्यात नागरिकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवण्यासाठी जबाबदार यंत्रणेवर दंडात्मक कार्यवाही करणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री जयंत आसगावकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, सत्यजीत तांबे, किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या संचमान्यता निकषांमध्ये नव्याने करण्यात आलेल्या बदलांमुळे अनेक शिक्षकांवर प्रतिकूल परिणाम होणे, या नव्या निकषांमुळे अनेक ठिकाणी तासिका कमी होणे, पदे अतिरिक्त ठरणे, बदलीची शक्यता निर्माण होणे तसेच सेवाशर्तीवर परिणाम होणे, ग्रामीण व दुर्गम भागातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्या नैसर्गिक कारणांमुळे कमी असणे, अशा परिस्थितीत नवीन संचमान्यता निकष लागू केल्याने तेथील शिक्षकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, सन २०२५-२६ च्या संच मान्यतेचे निकष

कोणालाही विश्वासात न घेता बदलल्यामुळे शिक्षक संख्येत कपात होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, नव्या संच मान्यता निकषानुसार प्रॅक्टिकलची बॅच ही २० विद्यार्थ्यांच्या संख्येवरून ३० विद्यार्थ्यांपर्यंत वाढवलेली असणे, ती पूर्वीप्रमाणे २० विद्यार्थ्यांची ठेवणे, तसेच राज्यातील विविध विभागात असलेल्या ४५ मिनिटाच्या तासिका ४० मिनिटाची करण्यात आलेली असणे, त्या पूर्वीप्रमाणेच ४५ मिनिटांच्या ठेवणे म्हणजे शिक्षक अतिरिक्त होण्याची भीती नसणे, नव्याने बदल करण्यात आलेल्या संचमान्यतेत अनेक त्रुटी आढळून येणे, यामध्ये विद्यार्थी संख्येचे निकष स्पष्ट नसणे, तुकडीला किती विद्यार्थी असावे, याचे निकष नसणे, एखाद्या वैकल्पिक विषयाला किती विद्यार्थी असावेत, हे स्पष्ट नसणे, विद्यार्थी संख्येमध्ये घोळ व गोंधळ असणे, विषयाला विद्यार्थी दिसतात पण वर्कलोड न दिसणे, तरी पूर्वीप्रमाणेच सुरू असलेले संच मान्यतेचे प्रचलित निकष कायम ठेवणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्रीमती माधवी नाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्यावरील अत्याचार रोखण्यासाठी "महिला समुपदेशन केंद्र" स्थापन करण्यात येणे, सदर केंद्राची सध्य:स्थिती अत्यंत बिकट असणे, सदर केंद्राना मनुष्यबळ आणि सक्षमीकरणाची असलेली आवश्यकता, सदर महिला समुपदेशन केंद्र पोलीस ठाण्याच्या आवारात व इतर ठिकाणी राबविली जाणे, परंतु सध्याच्या वाढती लोकसंख्येचा व गुन्हयांचा विचार करता केंद्र अपुरी पडत असणे, तसेच या केंद्रामध्ये काम करणा-या समुपदेशकांना मिळणारे मानधन अत्यंत तुटपुंजे असणे, पूर्वी ८ हजार रुपये मानधन होते त्यानंतर सन २०१४ पासून १२ हजार रुपये मानधन मिळत असणे, सदर मानधन वेळेत न मिळणे, मानधन वाढीसंदर्भात प्रस्ताव तत्कालीन आयुक्त यांनी महिला व बालविकास विभागाच्या सचिवांना दिनांक २३ जून, २०२५ रोजी सादर करुनही अद्याप निर्णय न होणे, अनेकवेळा शासकीय निधी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने केंद्राच्या कामकाजात येत असलेले अडथळे, बहुतांश केंद्रामध्ये पायाभूत सोयी-सुविधांचा असलेला अभाव, लोकसंख्येच्या प्रमाणानुसार केंद्रांची वाढ, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून समपुदेशकांच्या मानधनात वाढ करुन त्यांना दर्जेदार प्रशिक्षण वेळेत मानधन मिळण्याकरिता करावयाची कार्यवाही तसेच नवीन महिला समुपदेशन केंद्र सुरु करावी ,विशेष आर्थिक तरतुद वाढवून निधी वितरित करावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(६) **सर्वश्री धैर्यशील कदम, विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून सहकार चळवळ ही शेती व्यवसायाचा आर्थिक कणा असणे, गावपातळीवर विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी ह्या शेतीसाठी कर्जाचा पुरवठा करीत असणे, मात्र सातारा जिल्ह्यात माण तालुक्यातील महाबळेश्वरवाडी येथील विकास कार्यकारी सहकारी सोसायटी व इतर सहकारी सोयायटीमध्ये मयताच्या नावावर कर्ज मंजूर असणे, ती कर्जाची रक्कम खात्यातून खोट्या स्वाक्षरी करून परस्पर काढली असणे, अतिशय कमी क्षेत्रावर लाखो रुपयांचे कर्ज दिले असणे, त्या सोसायटीच्या चेअरमनच्या मयत आईच्या नावावर कर्जाचे वाटप केले असणे, काही मयत व्यक्तीच्या नावावरील कर्ज भरणा केला असतानाही त्या कर्जाचे पुनर्गठन केले असणे, मयताच्या नावावर शासकीय कर्ज माफीचा फायदा घेतला असणे, खोट्या स्वाक्षरी करून कर्ज प्रकरण करणे, बँकेतून परस्पर संगनमताने रकमा काढून त्या सोसायटीचे पदाधिकारी व अधिकारी यांनी परस्पर संगनमत करून फार मोठ्या रकमेचा अपहार करून भ्रष्टाचार केला असणे, याबाबत दिनांक ३१ मे, २०२३ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा व इतर शासकीय कार्यालयाकडे तक्रार करूनही हेतूपुरस्सर कोणतीही कारवाई झालेली नसणे, त्यानंतर दिनांक २२ जून, २०२६ रोजी मयताच्या नातेवाईकाने म्हसवड पोलीस स्टेशन, तालुका माण, जिल्हा सातारा येथे त्याच्यावरील कोणतीही कारवाई न होणे याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची भूमिका."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा–**

(क) **श्री. सुनील कर्जतकर,** ॲड. निरंजन डावखरे, श्री. अमित गोरखे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"मौजे चोफुला, मांजरेवाडी, पिंपळे जगताप, शिक्रापूर (ता. शिरूर, जि. पुणे) येथील जवळपास १३३२ शेतकऱ्यांच्या शेतातून सन २००७-२००८ या कालावधीत रिलायन्स कंपनीमार्फत गॅस पाईपलाईन टाकण्यात आलेली असणे, सदरहू कामाचा शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देताना भेदभाव करण्यात येणे, सदरहू गॅस पाईपलाईनचे काम करताना येथील गवळी महाराज सहकारी पाणीपुरवठा संस्था, मु.पो. दहिवाडी, ता. शिरूर यांच्या पाण्याच्या पाईपलाईनचे नुकसान करण्यात येणे, यामुळे या पाण्यावर अवलंबित शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये मुल्याच्या शेतीपीकांचे नुकसान होणे, या प्रकरणी प्रशासकीय व विधिमंडळ स्तरावर झालेल्या विविध बैठकींच्या माध्यमातून तत्कालीन संबंधित कृषी

अधिकारी व इतर संबंधितांनी या प्रकरणी गैरप्रकार केल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकरणी ज्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला त्यांना केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि खनिज पाईपलाईन अधिनियम, १९६२ नुसार नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता असतानाही शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, या प्रकरणी संबंधित बाधित शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाईची रक्कम तातडीने मिळवून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

(ख) **सर्वश्री अभिजित वंजारी,** सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाअंतर्गत अनुदानित शाळांना वेतन व वेतनेत्तर अनुदान हे एप्रिल, २०२५ च्या वेतन अनुदानाच्या आधारावर ४% वेतनेत्तर अनुदान, १% इमारत भाडे याप्रमाणे देण्यात येत असणे, सन २००९ च्या दरम्यान ५ वा वेतन आयोग अंमलात होता सद्य:स्थितीत ७ वेतन आयोगाचा कालावधी संपत आला तरी नवीन वेतन आयोगाच्या प्रचलित धोरणानुसार राज्यातील शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यात येत नसणे, खाजगी अनुदानित शाळांना विद्युत बिल, इमारत दुरुस्ती व इतर सर्व काम करुन घेण्यासाठी ५ व्या वेतन आयोगाच्या नियमानुसार देण्यात येणारे अनुदान अत्यंत कमी असणे, तेव्हा राज्यातील सर्व शाळांना ७ व्या वेतन आयोगानुसार ५% वेतनेत्तर अनुदान मंजूर करण्यासाठी व तसेच पी.डब्लु.डी. व जिल्हा परिषद यांनी निश्चित केलेल्या इमारत भाडेनुसार अनुदान देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**आठ : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(४)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**नऊ : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

**(क)** **श्री. प्रविण दरेकर,** डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री विक्रम काळे, प्रसाद लाड, हेमंत पाटील, शिवाजीराव गर्जे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, डॉ.मनिषा कायंदे, श्री. इद्रिस नायकवडी,

डॉ. परिणय फुके, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अनिकेत तटकरे, अमित गोरखे, किशोर दराडे, झीशान सिद्दिकी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, विक्रम काकडे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रविंद्र फाटक, वसंत खंडेलवाल, दुष्यंत चतुर्वेदी, सदाशिव खोत, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, गोकुळ गीते, अमरिशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, सुनील कर्जतकर, श्रीमती माधवी नाईक, सर्वश्री प्रमोद जठार, विवेक कोल्हे, अरुण लखानी, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, डॉ. राजीव पोतदार, सर्वश्री संजय भेंडे, प्राजक्त तनपूरे, प्रविण पोटे-पाटील, राजेंद्र राऊत, अविनाश ब्राम्हणकर, नंदकिशोर महाजन, धैर्यशील कदम, अमरनाथ राजूरकर, बसवराज पाटील, सुहास शिरसाठ, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील दोन वर्षांच्या काळात मुंबईसह एमएमआरडीए व पीएमआरडीए भागात पर्यावरणपूरक व गतीमान दळणवळण आणि गृहनिर्माण, झोपडपट्टी निर्मूलन हे मुद्दे केंद्रबिंदू मानून व स्मार्टसिटीचे लक्ष डोळयासमोर ठेऊन स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात येणे, ही शहरे खड्डेमुक्त करण्याकरिता रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी सारख्या गजबजलेल्या भागांचे पुनर्वसन करण्याकरिता एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे होणार असणे, स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पांना प्रोत्साहन मिळण्यासाठी पुनर्विकास करारनामा करणे, मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दीर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्यांवर पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, मुंबईकरांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळण्याकरिता मुंबईत मोबाईल मेडिकल युनिट सुरु करण्यात आले असणे, मुंबई, एमएमआरडीए व पीएमआरडीए, नागपूर, छत्रपती संभाजीनगर इत्यादी मोठया शहरांचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक गतीमान विकास करण्याचा व ही शहरे झोपडीमुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

(ख) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, अंबादास दानवे, अरुण लाड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, सुधाकर अडबाले, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदारी मध्ये झालेला गैरव्यवहार, राज्यभरातील ठेकेदारांची करोडो रुपयांची देणी प्रलंबित असणे, कंत्राटदारांना कामांची बिले मिळाली नसल्याने सुमारे ३ लाख कंत्राटदारांनी काम बंद करण्याचा इशारा देणे, प्रलंबित देयके मिळविण्यासाठी टक्केवारीची मागणी करणे, प्रलंबित बिलांमुळे लहान व मध्यम कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडल्याने व्यवसाय बंद करणे, तसेच आत्महत्येचा मार्ग स्वीकारणे, नगरविकास विभागाकडून वित्त आयोगाचा मिळणारा पैसा रखडल्याने महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक संस्थांचे विकास कामे थांबणे, महानगरपालिका व नगरपालिका यामध्ये नोकर भरती न होणे, मुंबईसह अनेक महापालिकांमध्ये पाणीटंचाई व पाणीचोरीच्या घटना घडणे, अनधिकृत बांधकामे, विकासकाम, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व बांधकाम परवानग्यांमध्ये गैरव्यवहाराच्या तक्रारी असणे, आर्थिक गैर व्यवस्थापन असणे, वाहतूक व पार्किंग समस्यांमुळे नागरीक त्रस्त होणे, महानगरपालिकांना जी.एस.टी. कमी मिळत असल्याने विकासकामे थांबणे, पुणे येथील बनावट दारु प्रकरण नुकतेच उघडकीस येणे, ग्रामीण भागात अवैध दारु व्यवसाय रोखण्यास अपयश येणे, छत्रपती संभाजीनगर येथे उत्पादन शुल्क विभागाने ९ किलोहून अधिक गांजा जप्त करणे, नवीन कामगार संहितांमुळे वेतन, कामाचे तास, ओव्हरटाईम, कंत्राटीकरण आणि कामगार हक्क कमी होण्याच्या भीतीमुळे अनेक संघटनांनी आक्षेप घेणे, त्यांचे पगार, भविष्य निर्वाह निधी गणनेत बदल झाल्याने व अन्य मागण्यांसाठी कामगार संघटनांनी चिंता व्यक्त करणे, कामगार कल्याण योजनांच्या लाभ वितरणात विलंब होत असल्याचा आरोप विविध संघटनांकडून होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

**दहा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

" मुंबईतील सर्वच अनुदानित माध्यमिक शाळांमधील बहुसंख्य शिक्षकांच्या सेवा मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्रिक्षण कार्यक्रमाकरीता, मतदार याद्या दुरुस्त करण्याकरीता आणि जनगणनेसाठी शासन यंत्रणेने अधिगृहीत केल्या आहेत, त्यामुळे दिनांक १५ जून पासून सूरु झालेल्या शाळांमध्ये प्रत्येक वर्गाला आणि विषयाला शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत

असणे, अशा प्रकारे शिक्षकांच्या सेवा अधिगृहीत न करणेबाबत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २७ मध्ये नमूद केले असणे, तसेच मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र.३६१२/२०२६, याचिका क्र. १८४१/२००९, याचिका क्र.५७३६/२०१५, याचिका क्र.३००६/२०११ व इतर याचिकेचे निर्णय शिक्षकांच्या सेवा निवडणूकपूर्व कामाकरीता अधिगृहीत करु नयेत असा निर्णय देऊनच खारीज झाल्या असणे, तरी संदर्भीय आदेशांच्या अनुषंगाने शिक्षकांकडे अशैक्षणिक कामे न सोपविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. अंबादास दानवे, ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

" राज्य शासनाने अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतूक व हाताळणी सेवांसाठी “एकत्रित निविदा” (Integrated Tender) धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला असून सदर धोरणाला मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आलेले असणे, नवीन निविदा धोरणामुळे अनेक वर्षांपासून अन्नधान्य हाताळणी व वितरण क्षेत्रात कार्यरत असलेले हजारो कामगार बेरोजगार होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, या धोरणामुळे अत्यावश्यक वस्तूंच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर परिणाम होऊन राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत लाभार्थ्यांना वेळेवर अन्नधान्य पुरवठा बाधित होणार असणे, सदर धोरणाविरोधात विविध कामगार सहकारी संस्था, कामगार संघटना व संबंधित घटकांनी तीव्र आक्षेप नोंदवून शासनाकडे पुनर्विचाराची मागणी केलेली असून त्यानुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १ जुलै, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद.